1167

1167
MUCĀṬE (Sidrām Basappā)
Khāndeśācem vijayī vīra povāḍā. Āvṛttī dusarī.
Ḍhulem (Amalner printed): S.B. Mucāṭe, [1930].
8 p. 16 cm.
Nationalistic ballads on the freedom fighters of Khandesh district.
NAI 1550
PP Mar B 37

NATIONAL ARCHIVES

(38) pp Mr 15 37

॥ श्री मयूरेश्वर ॥

पुस्तक ६ वे.

श्रीमत्सार्थ स्वातंत्र्यसंग्रामांतील

स्वान्देशाचे विजयी वीर

पोवाडा

लेखक:- सिद्धाय चमत्कार मुळगांवकर,
राष्ट्रीय शाहीर, पुणे.

हक्क कर्त्याचे स्वाधीन.
आवृत्ती दुसरी.
किंमत १ आणा.

INDIA OFFICE LIBRARY
CHINSURA
NATIONAL ARCHIVES

दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

जगश्रेष्ठ महात्माजींच्या स्वातंत्र्यसंग्रामांत खान्देश
नेहि बरीच आघाडी मारली. परंतु त्यांत श्री.
बोरखाने, देवकीनंदन, डॉ. कोठारी, भगनलालजी,
जिल्हाधिकारी श्री. ठक्कार, पंडित भामरे, मांगीलालजी
कल्याणजी, क्षीरे व कॅप्टन विश्वासरावांसारखे मोहरे
पडले. जी. आय. पी. संपातील कार्यकर्ते श्री.
नारायणराव वैद्य यांनाही या दडपशाहीत आठ
महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा ठोठावण्यांत आली
आणि धुळ्यांतील 'युवक संघाचे' सेक्रेटरी श्री.
शंकरराव साप्ते यांना तर एक वर्षाची निर्दय शिक्षा
कर्माविली गेली. त्या सर्व वीरांचेच पोवाडे या
पुस्तकांत दिले आहेत.

प्रथमावृत्ती (१०००) अवघ्या पांच तासांचे आंत
खलासच झाली. व अत्यंत अल्पावकाशांत
पुन्हां दुसऱ्या आवृत्तीचा योग येऊन, माझ्या कवन
शक्तीस जास्तच उत्तेज मिळालें; त्या बद्दल मी
या सर्व "विजयी वीरांचे" आभार मानतो

ता. २१।५।४७
ई. सा. ८ शके १८५२

शाहीर.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

PRESS OFFICE
LIBRARY

॥ जयभवानी ॥

बोला, कोण कोण लढणार

(चाल - हर हर महादेव बोला)

स्वातंत्र्य वीर बंधूंनो, बोला कोण कोण लढणार ?
तरुण हो कोण कोण उठणार ? ॥ धृ० ॥

आजपरी केला वक्तृत्वानें, लेखणीनें भडिमार ।
कसोटीचा अजि दीन पातला, सत्य कोण ठरणार॥१॥

दडपशाहीची गोळी सुटली, खाक तुम्ही होणार ।
त्या गोळीस्तव ढाल छातीची कोण कोण करणार॥२॥

कुटील कायदा कांटा हलला, माय बाप सरकार ।
कांट्यालागीं फांटा देऊनि, कधीं मुक्त होणार ? ॥३॥

स्वातंत्र्यास्तव लढले पूर्वज, सिंहासन अनिवार ।
वंशज त्यांचे घुर्कट भुर्कट, पिलां काय डरणार ? ॥४॥

हरेस पडला मोहरा तुमचा, तरुणांचा सरदार ।
लाल जवाहिर अटक जाहले, स्वस्थ काय बसणार॥५॥

करबंदीचा ठराव सांचा, तुमचा प्राण आधार ।
यास्तव झाले अटक तरी कां करां तुम्ही भरणार॥६॥

बाप जयाचा समरीं पडला, गाजवितां तलवार ।
पुत्र तयाचा म्हणुनी मग कां, मरणाला भीणार ? ॥७॥

राष्ट्रध्वज हा स्फुरवित सकलां, "करा जरा सुविचारें"।
अखिल हिंदुनों इस्लामांनों, व्हाव आतां तय्यार ॥८॥
पंजाबाचा केसरी लाला, झाला ज्यास्तव ठार।
विजयध्वज तो आज फडकला, घेऊं नका माघार॥९॥
चिर शांतीनें विजय आपुला अखेरीस होणार।
राष्ट्रीय शाहीर सिद्धामाचे बोल सत्य ठरणार ॥ १० ॥

नारायण विजयी झाला !

(चाल – उद्धवा शांतवन.)

स्वातंत्र्य संगरीं लढला । नारायण विजयी झाला ॥धृ०॥
फुंकिली जयें रणभेरी । एप्रील एकवीसावीला ।
ऐकुनियां आली घेरी । लटपटला टोपीवाला ।
ही नरवीराची स्वारी । वैध नांव साजे ज्याला ।
लागला रोग शत्रूला
साम्राज्यशाही वाल्याला
निज – मात्रा देण्या स्याला
बेपराज आपुला गेला । नारायण विजयी झाला १.
लागली शोध बहु होती । जया घुळें लोकशाहीला

घालुनियां अंजन नेत्रीं । उठविले जयानें तिजला ।
खडबडुनी जागे होती । स्वातंत्र्य लढा लढण्याला

सजविली हिंदवी सेना
नोकरशाहीची दैना
मादिरेचा उडवित फेना

घाबरला गुरखेवाला । नारायण विजयी झाला २.

पाहुनियां नरवर ऐसा । खुष झाली परकीय बाला
करीं घेऊनियां मग शेला । धुंडते नवरदेवाला
परि ठाऊक नव्हतें तिजला । कीं तोही सिद्धि झाला

लागले वेड पोरिला
खान्देश सर्व धुंडीयला
परि पडली गांठ धुळ्याला

घातली तियेनें माला । नारायण विजयी झाला २.

नवरदेव ऐसा सजला । वैशाख शुद्ध तृतियेला
मग सत्याग्रह शिबिरात । परणूनियास्तव जो गेला
पातले सकल प्रिय मित्र । जणं ब्रम्हांड ये लयाला

मंगल वाद्यांचा नाद
सुमदुमला सर्व धुळ्यांत
ऐशा त्या जयघोषांत

मिरवीत वीर जो निघला । नारायण विजयी झाला ४.

पुण्याचे घालुनि हार । पोशाक तया चढवीती
किती 'वंदेमातरम्' वदती । कुणी छायाचित्रें घेती
बालिका पुजा किती करिती । कुणी श्रीफल हातीं देती
किती सुवासिनी वरतोनी
पुष्प अक्षता फेकोनी
शुभ आशिर्वाद देवोनी
नमुनि त्या सर्व भगिनींला । नारायण विजयी झाला ५.

पोहोंचतां मंडपा जवळीं । तरुवरती चढुनि वदला
जणुं कृष्ण द्वारकाधीश । दे निरोप निज मित्रांला
" वरुनियां नागकन्येला । मर्दिन मी कालियाला
परि एक विनंती सकलां
तुम्ही पूर्ण शांतता पाळा
नीदास न आपुल्या ढाळा "
मग मंडपांत जो शिरला । नारायण विजयी झाला ६.

वेसला वोहल्या वरती । मंगलाष्टकें सुरूं झाली
फौजदार, पोलीस, जज्ज । जणुं ब्राह्मण भटजी आली
लग्नाच्या भरल्या घटिका । लागली विराची टाळी
पोहोंचला श्वशूर गृहाला
स्वाण्या पाहुण्चाराला
जेवत निघुनियां गेला

जिंकुनिया निज नवरीका । नारायण विजयी झाला ७.

राष्ट्राचा तेऊकुन तारा । वीराचा ठरला वीर
साक्षीदार खाती वारा । अधमाधम ठरले चोर
हे बगलबच्चे परक्यांचे । म्हणुनिया घेती कैवार
जे दंड खंड झालेले
शिक्षाही भोगुनि आले
असे नालायक ठरलेले
ते लायक हो साक्षीला । नारायण विजयी झाला ८.

बहु वऱ्हाड आटोकाट । दाटले नवरदेवाचे थरथरले बघुनी त्यांना । मग वऱ्हाड ते नवरीचे
बंदुकिच्या देती दुरुण्या । गर्दीत शिरुनियां मग जे
जगीं श्रेष्ठ मान नवऱ्याचा
अपमान होय आज्जि त्याचा
परि राग न कोणा ह्याचा
वदनात शांतता ह्याला । नारायण विजयी झाला ९.

लग्नाचें आपुलें कार्य । बहुतेक संपले पार
साहिली वरातिचि आतां । आठ महिन्यांनीं निघणार
त्या वरातीचि तैयारी । तुम्ही कशी काय करणार?
पोशाक खादिचा शुद्ध
करणें हें आपुलें ध्येय
आपरी दुजें नच ध्येय
या शाहीर सिद्धामाला ; । नारायण विजय झाला १०

श्री कृष्ण करील विध्वंस !

(चाल :-- असा धगी छंदः)

मातला कंस, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ धृ० ॥

शांततेच्या स्वातंत्र्योद्धीं
कंस घेत वीरांची आहुती
विनाश काले विपरीतबुद्धी
सुचली त्याला, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ १ ॥

गांधी रुपानें प्रभु अवतरला
जुलमी सत्ता ताडायाला
तयार होतां धाक पडियला
गोऱ्या कंसास, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ २ ॥

धाराजनेवर करण्या हल्ला
कृष्णराज हो तयार झाला
अवचित जाउनि घाला पडला
मध्यरात्रीस, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ३ ॥

अनितीशाही चालू करुनी
कृष्णासह गोपालां धरुनी
कंस टाकितो बंदी खानीं
पापांची सजा, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ४ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

बळी घेतले ऐसें कितीकां
धुळें शहरचा मक्कार ऐका
सात जणांचा साधुनि मोका
आठवा खास, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ५ ॥

शंकर नामें गोपालाला
फौजदार तो घेण्या आला
अक्रुर जैसा श्रीकृष्णाला
नेत मथुरेस, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ६ ॥

मोटारीचा रथ हा सजला
राष्ट्रध्वज वरती फडफडला
शंकर जावई सज्ज जाहला
वधू जिकण्यास, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ७ ॥

मिरवीत मिरवित वीर जो जाई
पुष्पांचा वर्षावची होई
नाही क्षत्ता सुवासिनीही
अशा समयास, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ८ ॥

वीराची वीरमाता आली
कडकडुनीया मिठी मारली
वीर पत्नी ओवाळूं लागली
अपुल्या पतिसं, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ९ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

कंसाचा दरबार थाटला
कृष्णलिलेचा न्याय चालला
नाटकशाळा वाटे मजला
बघुनिया तीस, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ १० ॥

आसुरी सत्ता न्याय ही आसुरी
एक वर्षाची सक्त मजूरी
सिद्रामाचा थाट शाहिरी
गात कवनास; श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ११ ॥

खादी गीत.

(चाल — खादी स्वदेशी.)

खादी सुबोधी ! किति साधी ही ! ॥ धृ ॥
स्वातंत्र्य देवी खरी हिंदभूची ।
अहो राजलक्ष्मी असे भारताची ॥ १ ॥
करी ऐक्य लोकी, सुलोकी वरी ही ।
स्वजातीस हो सिद्ध परतंत्रता ही ॥ २ ॥

NATIONAL ARCHIVE OF INDIA

विजयध्वज हा फडफडला !

(चाल - हर हर महादेव बोला.)

या सुवर्ण हिंद भूमीचा, विजयध्वज हा फडफडला ॥धृ.॥
मायभूमि ही छळिली पिळीली कुरा केलें तिजला ।
तेहतीस कोटी देव त्रासले, राक्षस सबला ॥ १ ॥
ोठारी, दास्ताने, साने, मगनलालजी हा ।
जळगांवाचा हिरा देवकीनंदन तो घरिला ॥ २ ॥
ठक्कार, पंडित, मांगिलाल कल्याणजी शेरेला ।
कॅप्टन तो विश्वासराव ही, बंदी लाभी पडला ॥३॥
घरभेदीचें पार्थी आपुला नाश सदा झाला ।
मातें पोटीं खर निपजोनी, कलंक लाविपला ॥ ४ ॥
लाज जरी कां यासी तरी तुम्ही राखा वाणीला ।
सर्व मजूर आणि व्यापाऱ्यांनों, बहिष्कार झाला ॥५॥
नायक गेले म्हणुनी जर का मप्प तुम्ही बसलां ।
आणां मग तो तुम्हां भक्षण्या संतानचि टपला ॥ ६ ॥
नेटानें पाहिजे पुन्हां तुम्ही कार्यकारी बनलां ।
विश्वासानें जग भरलेलें, दावा शाबला ॥ ७ ॥
शाहीरवाणी सिद्धामाची खात्री देत सकलां ।
सत्याचा तो विजय शेवटीं अशीच ठरलेला ॥ ८ ॥

NATIONAL ARCHIVE OF INDIA

॥ जय भवानी ॥

खान्देशांतील सुप्रसिद्ध राष्ट्रीय शाहीर

कै. कृष्णाजी पांचे

यांनी तयार केलेले

: द्वितीय तयार :

मर्दमराठी रंगा पतंगाची

व

दिवसचा दिवस

हे अत्यंत लोकप्रिय पोवाडे सर्व ठिकाणी मिळतात.

खानदेश मराठा बोर्डिंग, जळगांव यांचे.

किंमत] प्रत्येकाची किंमत [१॥ आणा.

अक्षय्यतृतीयेच्या दिवशी, सरदार बाजीप्रभु देशपांडे

व शाहीरांचे वीर, किंमत प्रत्येकी – दोन आणा.

"हिंदुस्थानची बदली शाली" व वेताळा पारच

मोहिनीचे व शोभेचे अशुभ ऐकताना पोट धरधरुन हंसू येते.

किंमत अर्धा आणा.

मुद्रकाचे:- श्री. सि. ब. मुजावट, राष्ट्रीय शाहीर पुणे.

प्रकाशक -- वासुदेव कृष्ण पांचे, जीवाराम ब्र. भालतेर

NATIONAL ARCHIVES OF INDIA